# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रीवादी दृष्टीकोन व कार्य

**कु. अमृता संगिता विठ्ठल अदाटे,** पीएच.डी. विद्यार्थिनी,
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, amru141972@gmail.com

---

**प्रस्तावना –** प्राचीन काळापासून हिंदूधर्माचा आधार वेद, स्मृती, पुराणे इ. मानला गेला आहे. त्यांतील 'मनुस्मृती' ही एक प्रकारे समाजाची कायदेसंहीताच होती. याच ग्रंथाने सर्व स्तरातील महिलांना शुद्राचा दर्जा दिला व त्यांचे अधिकार नाकारले. स्त्रियांनीही स्वत:ला चूल-मुल या कोशात बांधून घेतले. त्यामुळे भारतीय स्त्रियांचा दर्जा दुय्यम बनत गेला. १९वे शतक भारताच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. वसाहतकाळात नवशिक्षित पिढी समाजातील जुन्या वाईट रितीरीवाजांवर टीका करू लागली. स्त्रीविषयक भान येण्यास समाजात सुरुवात झाली. सतीप्रथा बंदी, स्त्री शिक्षण, विधवा विवाहांना प्रोत्साहन, स्त्री-पुरुष समानता इ. नवीन विचार रुजवण्याचे काम राजा राममोहन रॉय, जोतीबा-सावित्रीबाई फुले, बाळशास्त्री जांभेकर, आगरकर इ. तत्कालीन समाजसुधारकांनी केले.

हीच विचारधारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी पुढे नेली. समताधिष्ठित समाज निर्माण व्हायचा असेल तर, 'स्त्रियांच्यात आत्मसन्मान असायला हवा असे ठाम मत त्यांचे होते'. आपले विचार त्यांनी भाषणाद्वारे, बहिष्कृत भारत-मूकनायक अशा वृत्तपत्राद्वारे व प्रसंगी कृती करून समाजात पोहचवण्याचे काम केले. मनुस्मृतीचे दहन, राज्यघटनेन स्त्रियांना समानता देणारी कलमे व हिंदू कोड बीलातील कृती आंबेडकरांच्या समाजात क्रांती करणाऱ्याच होत्या. राज्यघटना, कायदे करताना समाजाद्वारे-जातीव्यवस्थेद्वारे स्त्री शोषणाचा मुद्दा त्यांनी राजकारणात अग्रक्रमावर आणला. बाबासाहेबानी केवळ दलित, गरीब स्त्रियांचाच विचार केला नाही तर अखंड स्त्रीवर्गासाठी ते कार्य करताना दिसतात. सदर शोध निबंधात बाबासाहेबांनी समाजात जागृती आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आणि त्यांची वैचारिक भूमिका यांचा आढावा घेतला आहे.

**संशोधन पद्धती-** या संशोधनासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर केला आहे. प्रस्तुत लेखात अनेक प्राथमिक, दुय्यम साधनांचे अंतर्गत व बहिर्गत परीक्षण करून मांडणी केली आहे.

**बाबासाहेबांचे स्त्रियांच्या परिस्थितीबाबतचे विचार -** बाबासाहेब जातीव्यवस्थेचा सिद्धांत मांडतात व अधोरेखीत करतात की जात व पितृसत्ता टिकवण्याचे काम स्त्रियांच्याद्वारे होते. पिढ्यानपिढ्या अपत्यावर केले जाणारे संस्कार स्त्रीया करत असतात. विषमता, लिंगभेदाचे संस्कारही त्यांच्याद्वारेच होते. आणि त्यामुळेच पुरुष प्रधान संस्कृतीने केलेल्या विषमता आधारित समाजव्यवस्थेची ती वाहक बनते.[१] या सर्व कारणांचा विचार करून बाबासाहेबांब स्त्रियांच्यात आत्मसन्मान, स्वाभिमान, कणखरपणा यावा व त्यांच्यातील कमीपनाची भावना दूर व्हावी असा उद्देश ठेवून विचार मांडताना दिसतात.

**अस्पृश्य स्त्रियांना मार्गदर्शन-** अस्पृश्य स्त्रियांना ते प्रश्न विचारतात, स्पृश्य व आमच्यात काय फरक आहे ?. तरीही आम्हाला हे गुलामगिरीचे जीवन जगावे लागते. प्रत्येक स्त्री नऊ महिन्यांनीच बाळाला जन्म देते. मग तुम्ही त्यांच्या पेक्षा स्वतःला कमी का समजता. अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न स्त्रीयांनीही खांद्यावर घ्यावा. जेणेकरून अस्पृश्यता निवारण्याचे काम लवकर पूर्ण होईल.[२] वरील संदर्भावरून अस्पृश्य स्त्रियांच्या मनातील भिती जावी व समाजकार्यात स्त्रीनेही पुरुषांच्या बरोबरीने बाहेर पडावयास हवे असे मत दिसून येते.

अस्पृश्य समाजाला पेहरावाचेही बंधन तत्कालीन व्यवस्थेने घातल्याचे दिसते. मळकी कपडे, चांदीचे-कथलाचे दागिने, गळाभर कळसच्या, कोपऱ्याभर भांगड्या, स्त्रियांची लुगडी गुडघ्यापर्यंत होती. अशा विषमता आधारित पेहरावाचा त्याग करण्यास व सवर्ण जसा पोशाख करतात तसे करण्यास बाबासाहेब सांगतात. तसेच मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करा व घरी जरी नवऱ्याने आणले तरी असे मांस बनवण्यास नकार द्या. मुलींना शिक्षण द्या. असा उपदेश ते स्त्रियांना करतात. त्यांच्या सभेसाठी आलेल्या महिलांपैकी विठाबाईने तसे वागण्याचे आश्वासन दिले.[३] बाबासाहेबांच्या बोलण्याचा परिणाम सभेवर आलेल्या स्त्रियांवर झाला. दुसऱ्या दिवशी गावी जाण्यापूर्वी स्त्रियांनी आपल्या पेहरावात बदल केला होता. त्यांच्या या विश्वासाबद्दल आठ-आठ आणे साडी-चोळीसाठी

सभेमार्फत दिले गेले. महाड म्युनिसिपलिटीच्या कचरापट्टीत नोकरी करणाऱ्या महारांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला.[४] अस्पृश्य समाजाभोवती असलेला गुलामगिरीचा पाश आपणच तोडला पाहिजे. सर्वांगीण सुधारणेसाठी स्त्रियांनी प्रयत्न करायला हवा. पुरुषांना अस्पृश्यता घालवण्यासाठी सहकार्य करण्याचे, त्यांना व्यसनापासून व इतर वाईट कामापासून लांब ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक स्त्रीवर आहे. भावी पिढीला गुलामगिरीचे जीवन दिसू न देण्याची जबाबदारी त्यांनी स्त्रियांवर टाकल्याचे दिसते.[५]

**देवदासीसाठी मार्गदर्शन-** आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा निर्णय घेतल्यानंतर कामाठीपुऱ्यातील समाजाने देवाच्या नावाने त्याग केलेल्या वाघ्या, मुरळी, जोगतिनी, देवदासींची एक खाजगी बैठक बोलवली होती. बाबासाहेब यावेळी स्त्रीच्या शिलासंदर्भात अर्थात चांगले चरित्र कसे असते यावर बोलतात. समाजात मान खाली घालाव्या लागणाऱ्या व्यवसायापासून दूर जाण्याचे व कष्टाने सन्मानाचे जीवन जगण्याचा सल्ला ते येथील स्त्रियांना देतात. तसेच आमच्यासोबत धर्मांतर करायचे असेल तर या मलीन जीवनाचा त्याग करण्यास सांगतात.[६]

**समता आधारित समाजासाठी सहविवाह-** समाजात असमानता आहे याला ४ बंदी कारणीभूत आहेत असे बाबासाहेबांचे मत होते. विविध जाती त्यांच्या पोटजाती यांच्यातही विविध स्तर आहेत. त्यांच्यात भेदाची मानसिकता निर्माण होते ती बेटीबंदी, रोटीबंदी, लोटाबंदी व भेटीबंदी या ४ बंदीमुळे. या बंदी समाज एकत्र येण्यास मर्यादा घालतात. श्रेष्ठ-कनिष्ठ, लहान-मोठा, आपला-परका असा भेदभाव निर्माण करतात. यामुळे एकाच वर्णात असूनही विवाहाचे नाते जोडले जात नाही. बाबासाहेब म्हणतात, उद्या खाण्या-पिण्याचे, भेटीचे प्रसंग निर्माण होतील. पण प्रामुख्याने बेटीचे अर्थात विवाहाचे संबंध जोपर्यंत एकमेकांच्यात येणार नाहीत तोपर्यंत खरी समता प्रस्थापित होणार नाही.[७]नाशिक येथे हिंदू समाज समता संघाची स्थापना झाली. येथे देखील स्पृश्य-अस्पृश्य समानता आणण्यासाठी सहभोजन व सहविवाह करण्याचा उपदेश ते देतात. कोणताही सनातनी सहभोजन झाल्यावर घरी जाऊन अंघोळ करून शुद्ध झाल्याचे सांगू शकतो पण अशी पळवाट विवाहासाठी घडू शकत नाही. विवाह संबंध जुळल्यानंतर दोन्ही कुटुंब समान राहतात. त्यामुळे जाती-धर्मातील भेद जर घालवायचे असतील तर विवाह संबंध हाच शेवटचा टप्पा राहील.[८]

**प्राथमिक शिक्षणासाठी स्त्रियां वंचित-** १९१७ साली प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे, यासाठी मुंबई महानगरपालिकेने एक ठराव मांडला होता. त्यामध्ये मुलांनाच प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे अशी नोंद होती. त्यावेळीचे विचारवंत केसरीकर म्हणतात, 'मुलीना आता शिक्षणाची गरज नाही, त्यांना मागाहून देवू.' याला ते पैसे कमी असल्याचे कारण देतात. यावर बाबासाहेब म्हणतात, ज्या राष्ट्रीय भक्तांनी स्त्रियास मताधिकार देण्याचा पुरस्कार केला त्यांनीच सक्तीचे शिक्षण नंतर देऊ असे म्हणणे विसंगतता दाखवणारे आहे. "स्त्री वर्गाला साक्षर करण्यास हे टोणगे तयार नाहीत." वरील बोलण्यातून आपणास समजू शकते आंबेडकर स्त्री शिक्षणासाठी किती जागृत होते.[९]

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राबवलेले कार्यक्रम - मनुस्मृती दहन**

भारतीय हिंदू समाजाने स्त्रीकडे केवळ पुरुषाची चैनी वस्तू म्हणून पाहिले. तिला दागदागिने घालून मढवले, पण माणूस म्हणून हक्क दिले नाहीत. शिक्षण घेवून मन सुसंस्कृत करण्याचाही तिला अधिकार नाही. स्त्रियांनी चांगली गृहलक्ष्मी व्हावे; त्याच्यापुढे जावू नये. गाईला आत्मा आहे मानणारे, स्त्रीलाही आत्मा आहे असे मानतात पण कृतीतून दाखवून देत नाहीत. याबाबत बाबासाहेब म्हणतात प्रत्येक व्यक्तीला पुर्णावस्थेत जाण्याचा अधिकार समाजाने द्यायला हवा.[१०]

स्त्रियांच्या स्थितीबद्दल मनुस्मृती काय सांगते याबाबत (९.१८) -मनुस्मृती स्त्रीचे शिक्षणाचे हक्क नाकारते. ज्या अर्थी ती वेद म्हणू शकत नाही त्या अर्थी ती अशुद्ध, पापमय आहे. (२.२१५)- स्त्रीच्या वासना प्रबळ असल्यामुळे ती ज्ञानी पुरुषाला गुलाम बनवू शकते. त्यामुळे एकट्या पुरुषाने आई,बहिण,मुलगी यांच्या सहवासात देखील राहू नये. (९.१४)- ती पुरुषाच्या वय सौंदर्य याकडे न बघता त्याच्या स्वाधीन होते. (९.१५)- चंचल स्वभाव, निर्दयीपणा यामुळे त्या पतीचा विश्वासघात करतात.[११] यावरून मनु स्त्रियांच्या बाबत काय विचार करतो हे दिसते. हिंदू स्त्रियाच्या व शूद्रांच्या या दशेला केवळ मनुस्मृतीच जबाबदार आहे असे ठाम मत आंबेडकरांचे झाले होते.

मानवाचे हक्क नाकारणाऱ्या मनुस्मृतीचे दहन महाडच्या सभेत एका खड्डयात अस्पृश्य बैराग्याच्या हातून केले गेले. विषमता, अन्याय करणाऱ्या ग्रंथाचा शेवट केला गेला.[१२]

**कुटुंब नियोजन व स्त्री आरोग्य-** आंबेडकर कुटुंब नियोजनासंदर्भात आपले मत मांडतात. 'कोणत्याही कारणासाठी का असेना जर स्त्रीला मुल नको असेल तर तिला ते टाळता येण्याचे स्वातंत्र्य आहे.' १९३८ साली 'पी.जे.रोहम.' यांच्यामार्फत मुंबई प्रांतांच्या विधिमंडळात संतती नियमनाचा ठराव मांडला गेला. या ठरावात त्यावेळी असणारी लोकसंख्या, वैद्यकीय सोई, मृत्यूचे प्रमाण इ. बाबी होत्या. परंतु धार्मिकबाबीचा विरोध या कारणामुळे विधेयक पास होऊ शकले नाही.[१३] स्त्रियांना प्रसुतीपूर्व रजा मिळावी म्हणून २८ जुलै १९२८ रोजी मुंबई विधिमंडळात बाबासाहेबांनी भाषण केले होते.[१४]

**संविधानातील स्त्री आधारित कलमे-** बाहेरच्या देशात मतदानासाठी, स्वातंत्र्यासाठी, समानतेसाठी स्त्रियांना चळवळी कराव्या लागल्या. भारतीय घटनेत स्त्रियांना सर्व हक्क दिले गेले. कलम १४-समानता, १५अ- विशेष अधिकार, १६(२)- स्त्री पुरुष भेदभाव नाहीसा करणे. २९घ- समान कामासाठी समान वेतन. ३९ब- कुवतीनुसार काम, ४२- मतदानाचा अधिकार इ. थोडक्यात जे जे अधिकार यापूर्वी नाकारले गेले ते राज्याघटनेद्वारे दिले गेले. घटना बनवताना बाबासाहेबांनी खूप कष्ठ घेतले, वंचित लोकांवर अन्याय होऊ नये व सुरक्षा निर्माण व्हावी अशा तरतुदी त्यांनी केल्याचे दिसते.[१५]

**हिंदू कोड बिल-** त्यांचे चौथे कृतीशील परिवर्तन म्हणजे हिंदू कोड बील. हिंदू कोड बिलात ज्या मुद्यांची मांडणी केली ते कायदे ब्रिटिशांच्या काळात तुकड्यांच्या स्वरूपात होते. त्यात प्रामुख्याने बालहत्या, सतीबंदी, विधवाविवाह, संमतीवय इ. समावेश होतो. परंतु हिंदू कोड बिलात स्त्रीकायद्यांचे एकत्रीकरण तर होतेच पण अशा तरतूदी होत्या ज्यामुळे समानता व स्वातंत्र्य प्रस्थापित होणार होते.

अ- एकपत्नीत्व – पुरुषांना अनेक विवाह करण्याचा अधिकार काढला गेला त्यामुळे सवत ही बाब बंद झाली.

ब- आंतरजातीय विवाहाचे स्वातंत्र्य दिले. आणि कोणत्याही जातीतले मूल दत्तक घेण्याचे स्वातंत्र्य दिले गेले.

क- घटस्फोटाचा अधिकार- पुरुषाकडून जर जांच होत असेल तर विवाह बंधनातून मुक्त होण्याचा अधिकार.

ड- पित्याच्या संपत्तीत 'दायभाग' अर्थात संपत्तीचा वाटा मुलाप्रमानेच सुन, मुलगी, पत्नी यांना देवू करणे.[१६]

विधेयक चर्चेसाठी संसदेपुढे ठेवण्यात आले. परंतु तत्कालीन सनातनी व कॉंग्रेसच्या काही नेत्यांनी या बिलास तीव्र विरोध केला. स्वामी जेरे शास्त्री यांनी आमचा धर्म बुडतो आहे, एका अत्यंजाने आमच्या धर्मात हस्तक्षेप करावा, नाल्यातून आलेली गंगा कशी असेल अशा शब्दात उल्लेख केला.[१७] स्वामी करपात्रा म्हणतात, बहिणीला संपत्तीत वाटा दिल्याने संपत्ती दुसऱ्या कुळात जाईल, घटस्फोटाने पातिव्रत्य नष्ट होईल, आंतरजातीय-सगोत्र विवाहाने रक्ताचे मिश्रण होईल असे भाष्य केले.[१८] ज्या स्त्रियांच्या प्रगतीसाठी हे बिल आणले त्यांनीच संसदेवर मोर्चा नेला. होणारा विरोध पाहून संसदेने २६ सप्टेंबर १९५१ रोजी बिल स्थगित केले. त्याच्याच दुसऱ्या दिवशी बाबासाहेबांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

बाबासाहेबांनी राजीनामा दिल्यानंतर कोल्हापूर येथे २५ डिसेंबर १९५२ रोजी एक सभा झाली. यावेळी स्त्रियांना उद्देशून ते म्हणतात, संपत्ती हाच स्वातंत्र्याचा आधार आहे. आणि जोपर्यंत संपत्तीचा वारसा तुम्हाला मिळणार नाही, तोपर्यंत तुमची गुलामगिरी संपणार नाही. आपल्या हक्कासाठी आपण लढले पाहिजे. मनाची दुर्बलता आपण काढायला हवी.[१९] तुमच्याच हक्कासाठी असलेल्या या बिलासाठी तुम्ही स्त्रियांनी काहीच हालचाल का केली नाही अशी खंत ते व्यक्त करताना दिसतात. दिल्ली येथील एका स्त्रियांच्या शिष्ट मंडळाचा ते उल्लेख करतात त्या या बिलास विरोध करण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी हे बिल वाचले देखील नव्हते. त्यातील एक स्त्री बाबासाहेबांना म्हणते, 'नवऱ्याने बिलास विरोध करायला सांगितला आहे. जर नाही केला तर तो सवत आणेल. सवतीपेक्षा बिलास विरोध करणे सोपे'. या प्रसंगातून स्त्रियांची दुर्बलता स्पष्ट दिसून येते.[२०] बाबासाहेब या सभेत स्त्रियांना सतर्क राहण्यास सांगतात. स्त्रियांच्याबाबत येणारी प्रत्येक तरतूद बारकाईने पाहण्यास सांगतात. स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी संघर्ष करावा, स्वातंत्र्यासाठी लढावे. संघटीत होऊन चळवळ कराव्यात. आपले हक्क प्रस्थापित करावेत. आणि समतेचा लढा उभा करावा असा आशावाद व्यक्त करताना ते दिसतात.[२१]

**निष्कर्ष** – समाजाचे मुल्यांकन हे स्त्रीची स्थिती काय आहे यावरून केले जाते. जगात अर्धी लोकसंख्या ही स्त्रियांची आहे. त्यामुळे जोपर्यंत स्त्रियांचा विकास होणार नाही, तोपर्यंत देशाचाही सर्व बाजूनी विकास होणार नाही हे बाबासाहेब जाणून होते. त्यामुळे स्त्री वर्गाच्या प्रगतीसाठी व वैचारिक जडणघडणीसाठी त्यांनी प्रयत्न केले. समाजातील भेद जावेत यासाठी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करण्याचे सुचवतात, ज्यामुळे समाजातील सर्व स्तर एकत्रित येतील. आजपर्यंत समाजव्यवस्थेने स्त्रियांवर अन्याय केला, त्यांचे हक्क- स्वातंत्र्य नाकारले. बाबासाहेबांनी संविधानाद्वारे स्वातंत्र्य व समानता तर दिलीच पण कायद्याचे संरक्षण देखील दिले

**संदर्भ साधने** –

१. प्रा.बोर्डे सुनिता, (लेख- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणाविषयक कार्य), संपा- डॉ. किरवले कृष्णा, जत्राटकर आलोक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती गौरव ग्रंथ, प्र. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०१६., पृ.४९

२.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लेखन आणि भाषणे १९२० ते १९३६,खंड १८ (भाग १). (लेख- अस्पृश्योन्नती व स्त्रियांची जबाबदारी बहिष्कृत भारत ३ फेब्रुवारी १९२८ ), संपा- नरके हरी, कासरे म.ल.,इ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००० पृ.१४३

३. कित्ता- पृ.१४४

४. कित्ता- पृ.१४५

५. कित्ता- पृ.२६६ (लेख- अस्पृश्य स्त्रियांनी सर्वांगीण सुधारणेसाठी झटावे. - जनता १७ ऑगस्ट १९३१)

६. कित्ता- पृ.५४८ ते ५५०(लेख- भगिनींनो समाजाला बट्टा लावणाऱ्या धंद्यापासून मुक्त व्हा. जनता ४ जुलै १९३६)

७. कित्ता- पृ.५०९ व ५१५

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लेखन आणि भाषणे,खंड १९ (१९२०-१९२८), संपा- नरके हरी, कासरे म.ल. इ., डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५, पृ.३८५.

९. कित्ता- पृ. ३० (लेख- टोणगे पान्हावातील काय ? मूकनायक २८ फेब्रुवारी १९२०.)

१०.कित्ता,पृ.२०२ (लेख- संकुचित ध्येय स्त्री वर्गापुढे ठेवणे अनुदारपानाचे दयोतक.बहिष्कृत भारत१५ जुलै १९२७)

११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लेखन आणि भाषणे १९२९ ते १९५६, खंड २० (लेख- हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनिती याला जबाबदार कोण ?), संपा- नरके हरी, कासरे म.ल. इ., डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००० पृ.३८९

१२. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पोप्यूलर प्रकाशन मुंबई, १९६६, पृ.११५

१३. प्रा.वाव्हळे मिलिंद (लेख- स्त्री मुक्तीचे प्रणेते: डॉ. बाबासाहेब आंबेडकर) संपा- प्रो.चोपडे बी.ए.,पवार ज.वी.,डॉ. अंभोरे उत्तम इ., नवयुगनिर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद, २०१६, पृ. ४५९

१४. उपरोक्त १- डॉ.सोनकांबळे चेतना ( डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीयांविषयक विचार. पृ.५२

१५. कित्ता पृ.५२

१६. परदेशी प्रतिमा (हिंदू कोड बिल, स्त्री शोषणाचा पहिला अखिल भारतीय नकार) संपा.- भागवत वंदना, सपकाळ अनिल इ., संदर्भासहित स्त्रीवाद, निरामय पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट, २०१४ पृ.२३७

१७. कित्ता- पृ.२३९

१८. कित्ता- पृ.२३८

१९. संपा- डॉ. जाधव नरेंद्र, बोल महामानवाचे, खंड १ (लेख- स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी मनोदौर्बल्य टाकून, कंबर कसून पुढे आले पाहिजे) पृ.३१९

२०. कित्ता- पृ.३२०

२१. कित्ता- पृ.३२